## (११) : गुजरात :

गुजरात विस्ताराने भारतातील लहान प्रदेश आहे. परंतु सुजलाम- सुफ़लाम असून प्राचीन इतिहासाने गौरविला आहे. गुजरातमध्ये २२ वे तीर्थंकर भ. नेमिनाथ यांचे ५ कल्याणक झाले. शाश्वततीर्थ शत्रुजंय भविष्यातील सर्वतीर्थंकरांची जन्मभूमी होणार आहे, असे वंदनीय स्थळे श्वेतांबर जैनांची सुध्दा अतिशय पूजनीय क्षेत्र गुजरातमध्ये आहेत. महुआ, सुरत अंकलेश्वर आदी क्षेत्रांचा संपूर्ण देशात महत्व आहे. आधुनिक काळातील दि. जैन
तत्वज्ञानी साधू पुरू ष कानजी स्वामी सोनगडमधीलच. जैन शिक्षण शोध संस्थान गुजरात मधीलच.

गुजरात मधील जैन समाज धार्मिक आणि सधन आहे. तिर्थयात्रेकरू नी गुजरात मधील सर्व जैन क्षेत्रांचा पुण्य लाभ घ्यावा.

### अतिशयक्षेत्र- महुआ

मार्ग: सुरत जिल्ह्यात हे क्षेत्र असून बारडोली वरू न १५ कि.मी. अंतरावर आहे. महाराष्ट्रातून सडक मार्गे नाशिक, गजपंथ,सातपुरा मार्गे जाता येते. १००० वर्षे प्राचीन जिनमूर्ती असून मुलनायक तळघरात विघ्नहर पार्श्वनाथाची अतिशय भव्य प्रतिमा आहे. ३ मजली मंदिर असून मंदिराचे बांधकाम आधुनिक आहे. प्रवेश द्वारावर ५ मजली टॉवर वजा बांधकाम असून त्यामुळे भव्यता आली आहे. हे क्षेत्र पूर्णा नदीच्या काठी आहे. सर्व विघ्न हरण करणारी भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा म्हणून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. भगवान शांतीनाथ, भगवान अनंतनाथ, भ. चंद्रप्रभूची मनोहरी मूर्ती आहेत.

सुविधा:  धर्मशाळा व भोजन व्यवस्था आहे.

## विद्यानंदी क्षेत्र- सुरत

मार्ग: सुरत हे महत्वाचे व्यापारी शहर असल्याने पुणे- मुंबई नाशिक येथून स्वतंत्र बसेस आहेत. रेल्वे मार्गे मुंबईवरू न २६३ कि.मी. अंतर आहे. तापी नदीच्या काठी वसलेले असून त्या ठिकाणी ३ दि. जैन मंदिर आहेत. पैकी गोपीपुराचे जिन मंदिर भव्य असून त्या ठिकाणी नव निर्मित मंदिर भट्टारक मुनीच्या चरणपादुका आचार्य शांतीसागर मुनींची मूर्ती आणि भव्य मानस्तंभ अहे.

सुविधा: चंदावाडी आणि विद्यानंदी क्षेत्र येथे धर्म शाळा आहेत.

## अंकलेश्वर

मार्ग: सुरत बडोदा महामार्गावर अंकलेश्वर सुरत ८० कि.मी. अंतर आहे. त्या ठिकाणी ४ दि. जैन मंदिर आहे.

(१) तळघरातील भगवान पार्श्वनाथाची मूर्ती, मनोहर असून विघ्नहरी असल्याने सतत भक्तगण येत असतात.

(२) भगवान महावीरांचे मोठे मंदिर आहे. भगवान सितलनाथ, चंद्रप्रभू प्रतिमाची गणना भारतातील श्रेष्ठ मूर्तीमध्ये केली जाते. पारगामी आचार्य घरसेन यांचे परम शिष्य पुष्पदंत, भूतबळी यांनी चार्तुमास, अंकलेश्वर येथे करून षटखंडागम शास्त्राचे लिखान केले असे मानले जाते.

सुविधा: ४ मंदिर लहान लहान गल्लीत आहेत. चौकशी करीत जावे लागते, धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - सजोद

मार्ग: अंकलेश्वर जवळ ८ कि.मी. हे क्षेत्र आहे. भूगर्भातून भगवान शितल नाथाची मूर्ती या ठिकाणी प्राप्त झाली आहे. नेहमी भक्तगण दर्शनासाठी येत असतात.

## अतिशयक्षेत्र  सोनगड

मार्ग: महुआ वरून ३००कि.मी. भावनागर वरू न २८ कि.मी. अंतर आहे. दि. जैन अध्यात्मिक संत कानजी स्वामी यांचे प्रेरणेने व मार्गदर्शनाने सोनगड हे साधनास्थळ बनलेले आहे. या ठिकाणी अनेक नुतन इमारती आहेत. सिंधर स्वामी मंदिर, स्मवशरण मंदिर, मानस्तंभ , महावीर कुंद कुंद परमागम मंदिर, या सर्वांची भव्य रचना असून ४ दिशाना ४ सिंमघर विराजमान आहेत.

मानस्तंभ- ६५ उंच भव्य मनोहरी आहे.

स्वाध्याय मंदिर: संपूर्ण चांदीच्या पत्र्यात समयसार कोरला आहे. या शास्त्रातील वंदितू या शब्दाला खरे रत्न जडविले आहे. हा शब्द माणिक रत्नाने सजविला आहे.
प्रवनचार पंचास्तिकाय आष्ठापाहुडचे दूर्मिळ असे भव्य लिखाण कोरले आहे.

सुविधा:  मंदिराच्या भोवताली उत्तम धर्मशाळा आहेत. भारतातून विद्वान लोक या ठिकाणी चर्चा , शिबिरासाठी सतत येत असतात.

## सिध्दक्षेत्र- पालीताणा

पांडव तीन द्रविड राजान आठ मुनि मुक्तिपयान।
श्री शत्रुंजयगिरीकेशीश भाव सहित वन्दो निश दिश।।

मार्ग:  पालीताणा महत्वाचे सिध्द क्षेत्र असून पुणे- मुंबई, नाशिक बडोदा अहमदाबादवरून नियमित बसेस आहेत. सोनगड पासून २२ कि.मी. भावनानगरवरून ५७ कि.मी. अंतर आहे.

पालीताणा शहरापासून ४ कि.मी. उंच पहाडावर शत्रुजय क्षेत्र आहे. ३ पांडव वृषभसेन मुनी सहीत ८ कोटी मुनी मोक्षास गेले. आदीनाथ तीर्थंकराचे २२ वेळा या ठिकाणी समवशरण झ ाालेले होते. भगवान नेमिनाथांचे वेळी २३ वेळा शमवशरण या ठिकाणी झाले होते.

मंदिरातील मूर्तीवर हिरे, रत्ने, आभुषण आदि करोडो रू पयाचे दागिने भगवंतावर आहेत. भगवान आदिनाथांचे बाबा मंदिर अतिप्राचीन व भव्य आहे. कुमारपाल, विनय शहा यांनी बांधलेले मंदिर अप्रतिम आहेत. शत्रुंजय पहाडावर जाणेसाठी सपाट मैदान आणि पाय-यांचा चांगला रस्ता आहे. एकूण ४००० पाय-या आहेत. पहाड चढणे कठीण आहे. पहाडाच्या पायथ्याशी अनेक श्वेतांबर मंदिरे आणि समवशरण अति भव्य आहे.

सुविधा: श्वेतांबर जैनाच्या अनेक भव्य धर्मशाळा असून सुविधा आहे. दि. जैन धर्मशाळा भैरवपुरा येथे आहे.

## अतिशयक्षेत्र - आमिझरो पार्श्वनाथ

मार्ग: इडर पासून १४ कि.मी. अंतर आहे. बडाली गावा जवळ दि. जैन अतिशय क्षेत्र पार्श्वनाथ मंदिर आहे. भट्टारक ज्ञान सागरजीने आपल्या शास्त्र रचनेत भगवंताच्या प्रतिमेतून अमृत पाझरते असे लिहिले आहे. म्हणून आमिझरो पार्श्वनाथ असे म्हणतात.

## सिध्दक्षेत्र - गिरनार

श्री गिरिनार शिखर विख्यात कोडी बहात्तर अरू सो सात।<br>
शंभु प्रद्युम्नकुमार द्वै भाय, अनिरू ध्द आदि नमू तसू पाय।।

मार्ग: अहमदाबाद मार्गे जुनागडवरू न ७ कि.मी. गिरनार हे क्षेत्र आहे. अहमदाबाद राजकोटहून जुनागढला रेल्वेने जाता येते. १०० कि.मी. अंतर कोठवाड विभागात हे क्षेत्र असून भगवान नेमिनाथ तिर्थकरांची दिक्षा ज्ञान आणि मोक्षभूमी आहे. पहाडावर चढण्यासाठी १०,००० पाय-या आहेत. पहिले टोक ४५०० पाय-या चढल्यावर या ठिकाणी भगवान नेमिनाथाचे मंदिर असून चरण पादुका आहेत. राजुमतीच्या गुंफ़ा असून त्या ठिकाणी झ-याचे पिण्याचे पाणी आहे. हिंदु लोक अंबादेवी म्हणून पूजा करतात. हे दुसरे टोक असून ११०० पाय-या चढल्यावर येते. तिसरे व चवथे टोक २६०० पाय-या चढून आणि उतरू न अत्यंत अशा २ कि.मी. लहानशा

रस्त्यावरू न सांभाळून जावे लागते. पाचवे टोक ६५० पाय-या चढून भगवान नेमिनाथांची चरणपादुकेजवळ येतो. हीच भगवान नेमिनाथाची निर्वाण भूमी आहे. हा सर्व कठीण पहाड असून वनश्रीने नटलेला आहे. गिरनारच्या पायथ्याशी नेमिनाथाचे पुरातन मंदिर असून मानस्तंभ आहे.

सुविधा: जैन बंडीलालजी कारखाना धर्मशाळा असून भोजनाची सुविधा आहे. जुनागड येथे जगमाल चौक मध्ये एक धर्मशाळा आहे. संपूर्ण वंदनेसाठी माणसी डोलीचा दर २००० रू . पर्यंत आहेत. पहिल्या टोकासाठी डोलीचा दर रू १४०० आहे.

## सोमनाथ

मार्ग: जुनागढ पासून वेरावळ सोमनाथ १०० कि.मी. अंतरावर आहे. सोमनाथ मंदिर अत्यंत भव्य असून समुद्र किनारी आहे. हिंदुंच्या १२ ज्योर्तिलिंगापैकी एक लिंग आहे. गझनीच्या महमदाने तीन वेळेस मंदिर उध्दवस्त करून जडजवाहीर लूटून नेले. परंतु १९५० साली वल्लभभाई पटेल यांच्या प्रयत्नाने त्या वेळेचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे हस्ते नवनिर्मित मंदिराचे उदघाटन झाले.

सुविधा: सोमनाथ ट्रस्टतर्फे व निर्मित बस स्टॅंड जवळ उत्तम धर्मशाळा आहेत.

## पोरबंदर

मार्ग: सोमनाथ पासून जुनागढ व तेथून महामार्गाने ८० कि.मी. अंतरावर पोरबंदर आहे. महात्मगांधीजीची हे आधुनीक बंदर असून अतिशय सुंदर आहे.

## राजकोट

मार्ग: अहमदाबादवरू न ३०० कि.मी. जामनगरपासून ८० कि.मी. आणि रेल्वेने बंगलोर राजकोट सोलापूरहून राजकोटला जाता येते. राजकोट हे गुजरात मधील मोठे व्यापारी केंद्र

असून त्या ठिकाणी शास्त्री मैदानाजवळ नवनिर्मित दिंगबर जैन मंदिर आहे. कलापूर्ण मानस्तंभ आहे. मंदिराच्या चौहोबाजूस अप्रतिम शिल्प सिंधर भगवान, आदिनाथ भगवान यांना आहार देताना आणि प्रथम जैन साहित्य निर्मितीचे सर्व दृष्य विलोभनीय आहे. राहण्याची सुविधा आहे. जामनगर या ठिकाणी जैन भव्य मंदिर असून तेथे मुलचंद जेठा धर्मशाळा आहे.

## पालनपूर अंबाजी

मार्ग: मेहसनावरून तारंगामार्गे १०० कि.मी. हे क्षेत्र आहे. हे जागृत क्षेत्र हिंदुचे अंबादेवीचे मंदिर असून येथील अंबामाता सिंहासनावर आरूढ आहे. येथे दररोज हजारो भावीक आपले मनोकामना पूर्ण करण्यासाठी भक्तीभावाने येत असतात.

सुविधा: मंदिराच्या भोवताली अनेक उत्तम धर्मशाळा व भोजनाची सुविधा आहे.

## सिध्दक्षेत्र - तारंगा

वरदत्ताय रू इद मुनिंद, सायरदत्त आदि गुणवृन्द।
नगर तारवर मुनि आठकोडी , बन्दौभाव सहितकर जोडी।।

मार्ग: मेहसाना वरून सडक मार्गे ७० कि.मी. अंतरावर अरवली पर्वताच्या कोठशीला व चित्तशीला नामक पर्वतावर मुनि वरदत्त सागरदत्त आणि साडे तीन कोटी मुनि या क्षेत्रावरून मोक्षास गेले आहेत. पर्वतावर तलाव, गुंफ़ा आणि चरण चिन्ह आहेत. पायथ्याशी १३ दिंगबर जैन मंदिर असून मूलनायक, संभवनाथाची भव्य प्रतिमा आहेत. आणि मानस्तंभ आहेत. हे मंदिर चालुक्य कालीन बांधले आहे. श्वेतांबर जैन समाजाचे भव्य मंदिर असून मुलनायक भगवान आजितनाथाची प्रतिमा भव्य आहे.

सुविधा: क्षेत्रावर उत्तम धर्मशाळा व भोजनाची सोय आहे.

## मेहसाना

मार्ग: अहमदाबाद मार्गे महामार्गावर ७२ कि.मी. अंतरावर मेहसाणा आहे. हे मोठे औद्योगिक शहर असून महामार्गाच्या लगत श्वेतांबर जैनाचे अत्यंत भव्य व विशाल मंदिर असून बाजूला नवनिर्मित सुंदर धर्मशाळा आहे. आणि भोजनाची सोय आहे.

## अहमदाबाद

मार्ग: मुंबईहून रेल्वेमार्गे आणि सोलापूरहून सुध्दा अहमदाबादला जाता येते. अहमदाबाद हे गुजरात राज्याची राजधानी असून गांधीनगर क्षेत्रात राज्याचे विधान सभा सचिवालय आदि नवनिर्मित इमारती आहेत. अहमदाबादमध्ये अनेक जिनमंदिरे आहेत.पौल जवळील जिनालय हे संपूर्ण संगमरवरी असून त्याच्या चारी बाजूस ५२ चैतालय आहेत.

प्रेक्षणीय स्थळे: जामा मशीद, सिध्दी सय्यद, सिध्दी दर्गाची हालती भिंत, गांधी साबरमती आश्रम.

सुविधा: रेल्वे स्टेशन जवळ रेवाबाई धर्मशाळा आणि चोखाबाजार येथे जैन धर्मशाळा आहेत.

## सिध्दक्षेत्र पावागड

रामचंद्रके सूत द्वै वीर, लाडनरिन्द आदि गुणधीर।

पांच कोडि मुनि मुक्ती मंझार, पावागिरी वन्दो निरधार।।

मार्ग:  बडोद्यापासून हलौल मार्ग ४५ कि.मी. हे क्षेत्र असून भगवान रामचंद्राचे दोन पुत्र लव-कुश आणि पाच कोटी मुनि मोक्षास गेले. प्राचीन काळी पावागड हा किल्ला होता. आता तो भग्न अवस्थेत आहे. त्यात एक भव्य जुने जैन मंदिर आहे. त्यात महावीर आणि संभवनाथाची मूर्ती आहे. पहाडावर जाण्यासाठी रोपवे ची सुविधा आहे. या ठिकाणी श्वेतांबर जैनांचे एक भव्य जैन मंदिर व धर्मशाळा रस्त्याच्या बाजूला आहे.

सुविधा: पायथ्यातील क्षेत्रामध्ये उत्तम धर्मशाळा आणि भोजनाची सुविधा आहेत.